मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | रविवार , 27 सप्टेंबर 2026 | अंक क्र. 135 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com



## अंबाजोगाईतील घरफोडीचा एलसीबीकडून पर्दाफाश

### परळीतून २ आरोपींना जेरबंद करत २७ तोळे सोने व ८५८ ग्रॅम चांदी जप्त

■ अंबाजोगाई: अशोक दळवी

घर बंद असल्याचा फायदा घेत चोरट्यांनी तब्बल ५३ तोळे सोने आणि पावणेदोन किलो चांदीवर डल्ला मारल्याची खळबळजनक घटना २० सप्टेंबर रोजी अंबाजोगाई शहरात घडली होती. या गुन्ह्याचा समांतर तपास करताना स्थानिक गुन्हे शाखेने (LCB) अत्यंत कौशल्याने अवघ्या ५ दिवसांत गुन्ह्याचा छडा लावला आहे. पोलिसांनी परळी परिसरात सापळा रचून दोन सराईत आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून २७ तोळे सोने आणि ८५८ ग्रॅम चांदीचा मौल्यवान मुद्देमाल जप्त केला आहे.

#### ५० हून अधिक सीसीटीव्ही तपासले

गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलीस अधीक्षक नवनीत काँवत व अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या पथकाने तपासाची चक्रे फिरवली. पथकाने परिसरातील ५० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची अत्यंत बारकाईने पाहणी केली. फुटेजमध्ये तीन संशयित आरोपी एका दुचाकीवरून जाताना दिसून आल्याने पोलिसांचा संशय बळावला.

#### परळीत रचला सापळा

२५ सप्टेंबर रोजी गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, अमर काकासाहेब थोरात व त्याचे साथीदार चोरीचे सोने विकण्यासाठी परळी परिसरात येणार आहेत. या माहितीच्या आधारे पोलिसांनी परळी भागात सापळा रचून अमर थोरात (वय २३, रा. क्रांतीनगर अंबाजोगाई) याला शिताफीने ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता त्याने साथीदार जगजीतसिंग अचलसिंग दुधानी (वय ३२, रा. शिवाजी चौक, परळी) आणि मंगलसिंग हिरासिंग बावरी यांच्या मदतीने घरफोडी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी लगेच जगजीतसिंग यालाही ताब्यात घेतले.



### ५० सीसीटीव्ही अन् गुप्त बातमीदार ५३ तोळे सोन्याच्या घरफोडीतील चोरटे पोलिसांच्या जाळ्यात!



#### लाखोंचा मुद्देमाल जप्त

पकडण्यात आलेल्या दोन्ही आरोपींकडून पोलिसांनी चोरीतील २७ तोळे (२७० ग्रॅम) सोन्याचे दागिने आणि ८५८ ग्रॅम चांदीचे दागिने असा लाखोंचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या गुन्ह्यात वापरण्यात आलेली युनिकॉर्न मोटारसायकलही निष्पन्न झाली आहे. सध्या दोन्ही आरोपींना पुढील तपासासाठी अंबाजोगाई शहर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले असून फरार आरोपी मंगलसिंग बावरी याचा शोध पोलीस घेत आहेत.



## शेतकऱ्यांच्या मदतीसाठी बांधावर उतरलेल्या बीड जिल्हा काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष बहादूर भाई व पदाधिकाऱ्याच्या मागणीला यश; परळीसह बीडमध्ये दुष्काळ जाहीर

### दुष्काळ जाहीर करण्याची बीड मधील काँग्रेसच्या पहिल्याच मागणी यश ; काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष बहादूर भाई व पदाधिकारी यांच्या पाठपुराव्याला यश

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :-

परळी तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करून शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी, यासाठी बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हा उपाध्यक्ष हनिफ करीम सय्यद उर्फ बहादूर भाई व काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी सर्वप्रथम कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली होती. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी करत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्यानंतर उपजिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले होते. दरम्यान, आज राज्य सरकारने राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला असून, बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथसह सर्व ११ तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. पायाला दुखापत असतानाही त्यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेत पिकांची पाहणी केली.

काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी, खासदार राहुल गांधी, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी खासदार तथा काँग्रेसच्या राष्ट्रीय नेत्या रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकदादा पाटील, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस आदित्यदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या सूचनेनुसार हनिफ करीम सय्यद उर्फ बहादूर यांनी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली. बीड जिल्हा व परळी वैजनाथ तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करावा, या मागणीसाठी बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हा उपाध्यक्ष हनिफ करीम सय्यद उर्फ बहादूर भाई यांनी काँग्रेस पदाधिकाऱ्यांसह शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली होती. पायाला दुखापत असतानाही त्यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेत पिकांची पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांनी पावसाने ओढ दिल्याने सोयाबीन, कापूस, तूर, मूग आदी खरीप पिकांचे मोठे नुकसान झाल्याचे सांगितले. पाणीटंचाई, वाढता शेती खर्च आणि कर्जाचा भार यामुळे शेतकरी अडचणीत असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर उपजिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देऊन हेक्टरी किमान एक लाख रुपये मदत, पंचनामे व पीक विम्याची रक्कम तातडीने देण्याची मागणी करण्यात आली. यावेळी बहादूर भाई, ॲड. अनिल मुंडे, ॲड. शशिशेखर चौधरी, सुभाष देशमुख, रणजित देशमुख, बाळासाहेब गित्ते, रसूल खान, गुलाबराव देवकर, वैजनाथ गडेकर, अप्पासाहेब नागरगोजे, शेख बबलू, शेख बाबा, नगरसेवक बबू, शेख सदाम तसेच शेतकरी व नागरिक उपस्थित होते.



दरम्यान, आज राज्य सरकारने राज्यात दुष्काळ जाहीर केला असून, बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथसह सर्व ११ तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे बहादूर भाई यांनी केलेल्या दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीला यश आले असल्याचे सांगितले.शेतकऱ्यांच्या अडचणी शासनापर्यंत पोहोचवून दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली होती. शासनाने दुष्काळ जाहीर केला असून आता शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळणे गरजेचे आहे," अशी प्रतिक्रिया हनिफ करीम सय्यद उर्फ बहादूर भाई यांनी दिली.



## प्रा. डॉ. मंगेश कराड यांना 'मराठवाडा रत्न' पुरस्कार

### राज्यपाल जिष्णू देव वर्मा आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्या ठाण्यात गौरव

■ पुणे/ ठाणे : प्रतिनिधी

एमआयटी आर्ट, डिझाइन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष तथा प्र-कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड यांना शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'मराठवाडा रत्न' पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. मराठवाडा जनविकास परिषद, ठाणे यांच्या वतीने मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून रविवारी (दि. २७ सप्टेंबर) आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

मराठवाडा जनविकास परिषद ही संस्था गेल्या १७ वर्षांपासून मराठवाड्यातील नागरिकांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवत आहे. संस्थेच्या वतीने दरवर्षी मराठवाडा बहुभाषिक दिन सोहळ्याचे आयोजन केले जाते. यंदाच्या सोहळ्यात शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रा. डॉ. मंगेश कराड यांची 'मराठवाडा रत्न' पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. त्यांच्यासह परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांना 'मराठवाडा मित्र' पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

मराठवाडा जनविकास परिषदेचे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम रविवारी सकाळी ११ ते दुपारी १.३० या वेळेत ठाणे येथील गडकरी रंगायतन, तलावपाळी येथे होणार आहे. या कार्यक्रमाला स्थानिक खासदार नरेश म्हस्के आणि आमदार संजय केळकर यांचीही उपस्थिती लाभणार आहे.

प्रा. डॉ. मंगेश कराड हे गेल्या ३५ वर्षांहून अधिक काळापासून शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली एमआयटी एडीटी विद्यापीठात शिक्षण, संशोधन, नवोपक्रम आणि कौशल्यविकासाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

# भेल सेकंडरी स्कूलच्या विराज राडकरची विभागीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

## जिल्हास्तरीय स्पर्धेत १४ वर्षांखालील गटात प्रथम क्रमांक; बीड जिल्ह्याचे करणार प्रतिनिधित्व

■ **परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**




जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे दि. २४ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत भेल सेकंडरी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलांच्या गटात चि. विराज लक्ष्मण राडकर याने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय कामगिरीमुळे त्याची विभागीय स्तरावरील बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. हिंगोली/परभणी येथे होणाऱ्या विभागीय बुद्धिबळ स्पर्धेत विराज हा बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. त्याच्या या यशामुळे भेल सेकंडरी स्कूलच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

विराजच्या यशामागे शाळेचे क्रीडा शिक्षक श्री. लक्ष्मण राडकर, श्री. यशवंत कांबळे, श्री. विवेक आघाव व श्री. राजाभाऊ गडदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. क्रीडा शिक्षकांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना विविध क्रीडा प्रकारांत उल्लेखनीय यश मिळत आहे.

या यशाबद्दल मुख्याध्यापक श्री. गिरीश ठाकूर व श्री. दत्ता नरहरे यांनी विराज तसेच क्रीडा शिक्षकांचे अभिनंदन केले. तसेच श्री. जुगलकिशोरजी लोहिया (अध्यक्ष, स्थानिक समिती), श्री. जीवनराव गडगुळ (कार्यवाह), श्री. अमोल डुबे (अध्यक्ष, शालेय समिती) यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालकवर्गाने विराजचे अभिनंदन करून विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



# दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलच्या स्पर्श वंजारेची विभागीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

## जिल्हास्तरीय स्पर्धेत चमकदार कामगिरी; शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा

■ **परळी (प्रतिनिधी )**

दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल, परळी वैजनाथ येथील इयत्ता आठवीचा विद्यार्थी चि. स्पर्श वंजारे याने जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत आपल्या बुद्धिमत्तेची, एकाग्रतेची आणि डावपेचांची प्रभावी छाप पाडली. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर स्पर्शची विभागीय स्तरावरील बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या यशामुळे दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. बुद्धिबळ या खेळामध्ये एकाग्रता, संयम, तर्कशक्ती, नियोजन आणि अचूक निर्णयक्षमता या गुणांना विशेष महत्त्व असते. स्पर्शने तालुकास्तरीय स्पर्धेनंतर जिल्हास्तरीय स्पर्धेतही आत्मविश्वासाने विविध डावपेचांचा वापर करत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. सातत्यपूर्ण सराव, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर त्याने मिळविलेले हे यश कौतुकास्पद ठरले आहे.

दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलच्या वतीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला विशेष प्रोत्साहन दिले जाते. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच क्रीडा क्षेत्रातही विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध करावी, यासाठी विविध उपक्रम व स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. त्याचाच सकारात्मक परिणाम म्हणून स्पर्श वंजारेने बुद्धिबळ क्षेत्रात मिळविलेले हे यश



शाळेसाठी अभिमानाची बाब ठरली आहे. स्पर्शच्या या यशाबद्दल शाळेचे मार्गदर्शक व प्रेरणास्त्रोत मा.श्री.किरण गित्ते सर (आय.ए.एस.), मुख्यमंत्री सचिव, सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, उद्योग व वाणिज्य विभाग, त्रिपुरा सरकार, विवेकानंद यूथ वेल्फेअर सोसायटीच्या अध्यक्षा : सौ.उषा किरण गित्ते मॅडम तसेच शाळेचे प्राचार्य डॉ.श्रीकांत पाटील सर यांनी त्याचे अभिनंदन करून आगामी विभागीय बुद्धिबळ स्पर्धेतही स्पर्शने उत्तम कामगिरी करून दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल, परळी वैजनाथचे नाव उज्ज्वल करावे, यासाठी त्याला मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.या यशामुळे परळी वैजनाथ शहर व परिसरातून या बाल खेळाडूवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# सेवा संकल्प अभियाना'च्या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन

■ नवी मुंबई प्रतिनिधी

१७ सप्टेंबरपासून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सेवा संकल्प अभियान राबविण्यास सुरूवात झालेली असून या अंतर्गत लोकसहभागातून नानाविध लोकोपयोगी उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यासाठी महापौर श्रीम.सुजाता पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी उपमहापौर दशरथ भगत, महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे, प्रभाग समिती अध्यक्ष शैला पाटील, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व डॉ.राहुल गेठे, प्रशासन विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे आणि इतर विभागप्रमुख, विभाग अधिकारी उपस्थित होते.

यावेळी महापौर महोदयांनी लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांनी एकत्रितपणे उपक्रम राबविण्याचे सूचित केले. यामध्ये जन्म – मृत्यू तसेच इतर प्रमाणपत्रांमधील प्रलंबितता दूर करण्याच्या दृष्टीने धडक मोहीम राबवावी असे निर्देश दिले तसेच दिव्यांगांना नवी मुंबईतच दिव्यांगत्व प्रमाणपत्र उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.अभियानामध्ये विविध स्वयंसेवी संस्थांनाही मोठ्या प्रमाणात सहभागी करून घ्यावे तसेच शासकीय व महानगरपालिकेच्या योजनांची माहिती व्यापक स्वरूपात लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी डिजीटल प्रचार – प्रसिध्दीवर अधिक भर देण्याचे सूचित करण्यात आले.



नवी मुंबईत व्यापक स्वरूपात वृक्षारोपण मोहीमा राबविताना त्यामध्ये लोकप्रतिनिधींना सहभागी करून घ्यावे व वृक्षारोपण स्थळांची निवड करताना त्यांच्या सूचना घ्याव्यात असे सूचित करीत महापौर श्रीम.सुजाता पाटील यांनी या पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात झाडांची पडझड झाल्याचे लक्षात घेऊन प्राधान्याने अशा झाडे पडलेल्या ठिकाणीच नवीन झाड लावण्याची मोहीम हाती घ्यावी अशाही सूचना केल्या. प्लास्टिकमुक्तीचे काम करणा-या संस्थांना या अभियानाशी जोडण्यात यावे तसेच वनहक्क समिती पुनर्जिवित करून आदिवासी समाजासाठी भरीव काम करण्याचेही महापौरांनी सूचित केले. तसेच विद्यार्थ्यांना या अभियानात मोठ्या प्रमाणात सहभागी करून घ्यावे अशाही सूचना देण्यात आल्या.उपमहापौर दशरथ भगत यांनी सुगंधी अंगण अभियान हा नागरिकांना स्वच्छता आणि आरोग्याशी आपुलकीने जोडणारा व त्यांची बांधिलकी व जबाबदारी निश्चित करणारा घटक असल्याचे स्पष्ट करीत या अभियानाची व्याप्ती वाढविण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा असे सूचित केले.महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सेवा संकल्प अभियानात सर्व विभागांनी पुढाकार घेऊन काम करण्याचे निर्देश देत प्रत्येक कार्यक्रमात लोकप्रतिनिधींना सहभागी करून घेण्याच्या सूचना केल्या. अभियानकाळात व पुढेही नागरिकांशी जोडलेल्या विषयांना प्राधान्याने हाताळण्याचे निर्देशित करीत विभाग पातळीवर होणारे कार्यक्रम नियोजनबध्द व्हावेत यादृष्टीने विभागप्रमुख दर्जाचे नोडल अधिकारी प्रत्येक विभागासाठी नियुक्त करण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले. उपक्रम करण्यासोबतच्या त्याच्या डॉक्युमेन्टेशनवर भर देण्याचेही निर्देश आयुक्तांमार्फत देण्यात आले.आपल्या राज्यातील गणेशोत्सवाला युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी शासनाने bappa.org या पोर्टलवर घरगुती अथवा सार्वजनिक गणेशोत्सवाची नोंद नागरिकांनी फोटो / व्हिडीओसह करण्याचे आवाहन केले असून या मोहीमेमध्येही जास्तीत जास्त नवी मुंबईकर नागरिकांनी सहभागी होऊन नोंदणी करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्याचे सूचित करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या वतीने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील कारकिर्दीला 25 वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून त्यांच्या कार्यकाळातील 'सेवा परमो धर्म' या उक्तीप्रमाणे सेवा कार्याचा लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने दि. 17 सप्टेंबर ते 17 ऑक्टोबर 2026 या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत असून यामध्ये सर्व नवी मुंबईकर नागरिकांनी लोकप्रतिनिधी व अधिकारी, कर्मचारीवृंदासह सहभागी व्हावे असे आवाहन महापौर सुजाता पाटील यांनी केले आहे.




# पावसाळ्यात पोटाचे संक्रमण टाळा

पावसाळ्यात, दमटपणा आणि साचलेल्या पाण्यामुळे जीवाणू, विषाणू आणि बुरशी यांची झपाट्याने वाढ होते. पाण्याचे स्रोत सहजपणे दूषित होऊ शकतात आणि दमट हवेमुळे अन्न लवकर खराब होते. त्याच वेळी, या हवामानात आपली पचनक्रिया मंदावते, ज्यामुळे पोट अधिक संवेदनशील बनते. दूषित पाणी आणि अन्नातील जंतू यांमुळे पोटाचे विकार, अन्नविषबाधा, जुलाब, उलट्या आणि कावीळसारख्या आजारांचा धोका वाढतो. त्यामुळे या दिवसांत खाण्यापिण्याच्या सवयींकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. अन्नसुरक्षेचे नियम पाळण्याबरोबरच रोगप्रतिकारशक्ती मजबूत ठेवली, तर अनेक संसर्गजन्य आजारांपासून संरक्षण मिळू शकते. सुरक्षित पाणी आणि ताजे अन्न महत्त्वाचे पावसाळ्यात नेहमी उकळलेले, गाळलेले किंवा शुद्ध केलेले पाणीच प्यावे. बाहेर मिळणारे पाणी वापरणे टाळावे. घराबाहेर जाताना स्वतःची पाण्याची बाटली बरोबर ठेवणे ही चांगली सवय आहे.

रस्त्यावरील उघडे खाद्यपदार्थ, आधीच कापलेली फळे आणि सॅलड खाणे शक्यतो टाळावे. घरचे ताजे आणि गरम अन्न हा सर्वात सुरक्षित पर्याय ठरतो. शिळे किंवा दीर्घकाळ साठवलेले अन्न खाणे टाळावे. अन्नाच्या गुणवत्तेबाबत शंका असल्यास ते फेकून देणे अधिक योग्य ठरते.फळे-भाज्या स्वच्छ धुवा पालेभाज्या आणि फळांवर चिखल, जंतू किंवा सूक्ष्म कीटक असू शकतात. त्यामुळे त्या वाहत्या पाण्याखाली नीट धुवाव्यात. शक्य असल्यास काही वेळ मिठाच्या पाण्यात भिजवून ठेवाव्यात. भाज्या कच्च्या खाण्याऐवजी शिजवून खाल्ल्यास संसर्गाचा धोका कमी होतो. स्वयंपाकघराची स्वच्छता आवश्यक दमट वातावरणामुळे स्वयंपाकघरात जंतू आणि बुरशी वाढण्याची शक्यता अधिक असते. स्वयंपाकाची जागा, भांडी आणि अन्नसाठा स्वच्छ व कोरडा ठेवावा. अन्न नेहमी झाकून ठेवावे आणि कोरडे पदार्थ हवाबंद डब्यांत साठवावेत.प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी काय कराल? मजबूत रोगप्रतिकारशक्ती शरीराला संसर्गाविरुद्ध लढण्यास मदत करते. त्यामुळे आहारात जीवनसत्त्वांनी समृद्ध मोसमी फळे, भाज्या, लिंबूवर्गीय फळे, आवळा, आले, लसूण, हळद आणि तुळस यांचा समावेश करावा. गरम सूप, हर्बल चहा आणि ताजे, पचायला हलके घरगुती अन्न अधिक लाभदायक ठरते.पावसाळ्यात तहान कमी लागत असली तरी पुरेसे पाणी पिणे आवश्यक आहे. कोमट किंवा सामान्य तापमानाचे पाणी आणि हर्बल पेये शरीरातील पाण्याचे संतुलन राखण्यास मदत करतात.नियमित हलका व्यायाम, पुरेशी झोप आणि तणावमुक्त जीवनशैलीही प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी महत्त्वाची आहे. तसेच हात वारंवार धुणे, पावसात भिजल्यानंतर लगेच कोरडे कपडे घालणे आणि परिसर स्वच्छ ठेवणे या सवयींमुळे संसर्गाचा धोका कमी होतो.

# महाराष्ट्राच्या लोककला आणि श्रीगणेश भक्तीने लखनऊ दुमदुमले

■ **मुंबई प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या सहकार्याने लखनऊ येथे आयोजित करण्यात आलेल्या 'लोककलेतील श्रीगणेश' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे अत्यंत भव्य, प्रभावी आणि दर्जेदार सादरीकरण झाले. महाराष्ट्राची समृद्ध लोककला, लोकपरंपरा, संगीत, नृत्य आणि श्रीगणेश भक्तीच्या विविध रंगछटांनी सजलेल्या या कार्यक्रमातून लखनऊच्या रसिक प्रेक्षकांना महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचा अनुभव मिळाला.

राय उमनाथ बली प्रेक्षागृह, कैसरबाग, लखनऊ येथे आयोजित या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून उत्तर प्रदेश विधान परिषदेचे आमदार पवन सिंह चौहान, भातखंडे संस्कृती विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. मांडवी सिंह, निखिलेश लखनवी, बिरजू महाराज कथक संस्थान, लखनऊच्या अध्यक्षा कुमकुम घर, उपाध्यक्षा निखिलेश तिवारी, उत्तर प्रदेश सांस्कृतिक विभागाचे माजी कार्यक्रम कार्यकारी अधिकारी कमलेश पाठक तसेच संगीत नाटक अकादमीचे माजी अध्यक्ष अच्चेलाल सोनी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.यावेळी उपस्थित रसिक प्रेक्षकांनी महाराष्ट्राच्या लोककलांचे उत्कृष्ट आणि प्रभावी सादरीकरणाची प्रशंसा केली. आणि.कार्यक्रमाच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल उपस्थित मान्यवरांनी



महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाचे मंत्री ॲड आशीष शेलार तसेच सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. महाराष्ट्राची लोककला आणि सांस्कृतिक परंपरा देशाच्या विविध भागांपर्यंत पोहोचविण्याच्या या उपक्रमाचेही उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.'लोककलेतील श्रीगणेश' या कार्यक्रमात महाराष्ट्राच्या विविध पारंपरिक लोककलांचे अत्यंत सुंदर आणि प्रभावी सादरीकरण करण्यात आले. गणेशवंदना, नमन, ओवी, मंगळागौर, गोंधळ, बाल्या नृत्य, गौरी-गणपतीवरील हिंदी रचना व भजन, संगीतमय नृत्यनाट्य तसेच वाद्यवृंदाच्या साथीने सादर करण्यात आलेला श्रीगणेश नृत्यकलाविष्कार अशा विविध सादरीकरणांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.कलाकारांनी आपल्या उत्कृष्ट नृत्य कलाविष्कारातून, अभिनयातून, पारंपरिक वेशभूषा, संगीत आणि नृत्याच्या माध्यमातून महाराष्ट्राची लोकपरंपरा लखनऊच्या मंचावर जिवंत केली.यावर्षी गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून घोषित करण्यात आले आहे. या निमित्ताने महाराष्ट्राची समृद्ध लोककला, लोकपरंपरा आणि लोकसंस्कृती महाराष्ट्राच्या सीमांपलीकडे देशाच्या विविध भागांत सादर करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. याच संकल्पनेतून 'लोककलेतील श्रीगणेश' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विविध लोककला आणि सांस्कृतिक परंपरांचे देशातील विविध राज्यांमध्ये सादरीकरण करण्यात येत आहे.महाराष्ट्राची ओळख केवळ त्याच्या इतिहास, परंपरा आणि सांस्कृतिक वैभवामुळेच नव्हे, तर त्याच्या समृद्ध लोककला आणि लोकपरंपरांमुळेही आहे. महाराष्ट्राच्या या अमूल्य सांस्कृतिक वारशाची देशभरातील रसिकांना ओळख करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे.देशाच्या विविध भागांत राहणाऱ्या कला आणि संस्कृतीप्रेमींना महाराष्ट्राच्या लोककलेचा प्रत्यक्ष अनुभव देण्याबरोबरच विविध राज्यांतील कलाकार आणि रसिक यांच्यात सांस्कृतिक संवाद व आदान-प्रदानाला प्रोत्साहन देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.महाराष्ट्राच्या लोकपरंपरेचे संरक्षण, संवर्धन आणि पुढील पिढीकडे हस्तांतरण करण्याबरोबरच महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख देशभर व्यापक स्वरूपात पोहोचविण्याचे कार्य या माध्यमातून केले जात आहे.या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे समन्वय श्रीकृष्ण कला फाऊंडेशन यांनी केले. फाऊंडेशनच्या कलाकारांनी आपल्या उत्कृष्ट कलाविष्कारातून महाराष्ट्राच्या लोककलेची समृद्ध परंपरा लखनऊच्या मंचावर प्रभावीपणे सादर केली.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी लखनऊ येथील कमलेश पाठक, दुर्गेश पाठक आणि आशुतोष पाठक यांचे प्रत्यक्ष सहकार्य आणि महत्त्वपूर्ण योगदान लाभले.लखनऊच्या रसिक प्रेक्षकांनी ज्या आत्मीयतेने आणि उत्साहाने महाराष्ट्राच्या लोककलांचे स्वागत केले, त्यामुळे महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश यांच्यातील सांस्कृतिक मैत्री आणि सांस्कृतिक आदान-प्रदानाला आणखी बळ मिळण्यास निश्चितच मदत होणार आहे.महाराष्ट्राची लोककला, श्रीगणेश भक्ती आणि लोकपरंपरेचा हा सांस्कृतिक जागर देशभर निरंतर पोहोचत राहावा आणि महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाला राष्ट्रीय स्तरावर नवी ओळख मिळावी, या भावनेतून 'लोककलेतील श्रीगणेश' हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम लखनऊ येथे अत्यंत यशस्वीरीत्या संपन्न झाला.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# ना. पंकजाताई मुंडे रखरखत्या उन्हात शेतकऱ्यांच्या बांधावर

## परळी तालुक्यातील लिंबुटा, पांगरी, कन्हेरवाडी शिवारात पीक परिस्थितीची केली पाहणी

### दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना धीर देत जाणून घेतल्या व्यथा ; हे सरकार बळीराजाचं आहे, शेतकऱ्यांचा बळी जाऊ देणार नाही







**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

पावसाने ओढ दिल्याने तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी आज लिंबोटा, पांगरी आणि कन्हेरवाडी शिवारात शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसान झालेल्या पिकांची पाहणी केली. शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी व व्यथा त्यांनी जाणून घेतल्या. आमच सरकार हे बळीराजाचं आहे, त्यामुळे त्याचा बळी आम्ही जाऊ देणार नाही, शेतकऱ्यांना भरीव मदत दिली जाईल अशी ग्वाही त्यांनी दिली.

यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने तूर, सोयाबीन, कापूस यांसह विविध पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी पिके हाताशी आलेली असतानाच पावसाअभावी वाया गेल्याचे चित्र आहे. त्यामुळे उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. या पाहणी दरम्यान शेतकऱ्यांनी आपल्या अडचणी व नुकसानीची माहिती पंकजाताई मुंडे यांच्यासमोर मांडली. पिकांचे झालेले नुकसान, पावसाची कमतरता आणि त्यातून निर्माण झालेली आर्थिक परिस्थिती याबाबत त्यांनी शेतकऱ्यांशी सविस्तर संवाद साधला.

■ **धीर सोडू नका; सरकार पूर्ण ताकदीने पाठीशी**

यावेळी शेतकऱ्यांना धीर देताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या,कमी पावसामुळे पिके वाया गेली असली तरी कोणीही धीर सोडू नका. हे सरकार पूर्ण ताकदीने तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. बाधित शेतकऱ्यांना लवकरात लवकर आणि भरीव मदत मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. मी मराठवाड्याचीच लेक आहे, त्यामुळे इथली परिस्थिती चांगल्या प्रकारे जाणते. शेतकऱ्यांवर आलेल्या संकटाची शासनाने गंभीर दखल घेतली आहे. प्रशासनाला प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करण्याचे निर्देश दिले आहेत. ज्या शेतकऱ्यांचे ज्या प्रकारे नुकसान झाले आहे, त्यांना त्यानुसार मदत देण्यात येईल. सर्व पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यात येणार असल्याचेही पंकजाताई मुंडे यांनी सांगितले.राज्य शासन या संकटात पूर्णपणे तुमच्यासोबत आहे. सर्वतोपरी मदत केली जाईल, असा धीर देत शेतकऱ्यांना दिलासा दिला.यावेळी परिसरातील शेतकरी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

■ **हे सरकार बळीराजाचे ; सर्वतोपरी मदत करणार**

राज्य सरकारने राज्यामध्ये दुष्काळ जाहीर केलेला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळ जाहीर केल्यानंतर आता या दुष्काळग्रस्त भागामध्ये राज्य सरकारकडून दुष्काळग्रस्त शेतकरी आणि जनतेला मदत करण्यासाठी विविध उपाय योजना करण्यात येणार आहेत. त्यामध्ये पीक कर्जांचे पुनर्गठन, जमीन महसूलात सवलत, शालेय विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी, वीज पंपांच्या बिलात सवलत, जलसंधारणाच्या कामांना गती, दुष्काळामुळे वाळलेल्या पिकांचे पंचनामे करून नुकसान भरपाई देणे यासारखी कामे केली जाणार आहेत.हे बळीराजाचे सरकार आहे. त्यामुळे बळीराजाला वाऱ्यावर न सोडता सर्वतोपरी मदत करणार असल्याचे पंकजाताई मुंडे यांनी यावेळी सांगितले.

# डीजेमुक्त उत्सव चळवळ गतिमान व्हावी ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर यांचे आवाहन




**सिरसाळा (प्रतिनिधी)**

सण-उत्सव आणि महामानवांच्या जयंतीमध्ये डीजेवर होणाऱ्या धांगडधिंग्यामुळे सणांच्या मूळ उद्देशाला हरताळ फासला जात असून महामानवांच्या विचारांची विटंबना होत आहे. त्यामुळे डीजेमुक्त उत्सव चळवळ अधिक गतिमान व्हावी, असे प्रतिपादन ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर यांनी केले. सुकळी (ता. सिरसाळा) येथे गणेश विसर्जनानिमित्त आयोजित कीर्तनात ते बोलत होते.

सिरसाळा परिसरात पत्रकार अशोक गलांडे यांच्या पुढाकाराने डीजेऐवजी पारंपरिक वाद्ये व सामाजिक उपक्रमांना प्राधान्य देण्याची चळवळ सुरू झाली आहे. याअंतर्गत सुकळी येथील 'जय हनुमान सार्वजनिक गणेश मंडळा'ने डीजे टाळून रक्तदान, आरोग्य व नेत्र तपासणी, दंत निदान, वृक्षलागवड, शाळांमध्ये चित्रकला-हस्ताक्षर स्पर्धा आणि स्वच्छता मोहीम यांसारखे विविध सामाजिक उपक्रम राबवले. विसर्जनाच्या दिवशी डीजेऐवजी कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते.

अभंगाच्या निरूपणादरम्यान महाराज म्हणाले की, सण-उत्सवांतून समाजाचे वैचारिक प्रबोधन होणे गरजेचे आहे. तरुणाईने पृथ्वीला स्वर्ग बनवण्यासाठी आणि संतांचे जात-धर्ममुक्त समाजाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पुढाकार घ्यावा. तसेच, सुकळी ग्रामस्थांनी व जय हनुमान गणेश मंडळाने राबवलेल्या उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले. या उपक्रमाला सरपंच संतोष सौंदनकर, मंडळाचे अध्यक्ष हनुमान झोडगे, उपाध्यक्ष राधाकिशन लव्हाळे यांच्यासह सर्व पदाधिकारी व ग्रामस्थांचे सहकार्य लाभले.

# कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात 'हिंदी दिवस व बक्षीस वितरण समारोह' उत्साहात संपन्न





**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगर संलग्नित कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय,परळी वै. येथील हिंदी विभाग आणि आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'हिंदी दिना 'निमित्त 'हिंदी पखवाडा ' आयोजित करण्यात आला होता.त्यात निबंध स्पर्धा ,नारा प्रतियोगिता,मेहंदी स्पर्धा आदी स्पर्धा घेण्यात आलेल्या होत्या. त्यात महाविद्यालयातील बहुतांश विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला होता.या विविध स्पर्धेचा 'बक्षीस वितरण समारोह' मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कै.लक्ष्मीबाई देशमुख शिक्षण प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष प्रा. प्रसाद देशमुख हे होते.प्रमुख वक्ते म्हणून नवगण महाविद्यालय,परळी वै. येथील प्रा.डॉ.दिलीप गिऱ्हे उपस्थित होते.त्यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करत असताना 'हिंदी ही राष्ट्रीय भाषा असून तिचा वापर आज वैश्विक स्तरावरही मोठ्या प्रमाणात होत आहे. हिंदीतील साहित्य समृद्ध असून ते कमालीचे कलात्मक आहे.हिंदी भाषा मनोरंजना बरोबरच रोजगार संधीचे उत्तम माध्यम आहे.'असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.विद्या देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.तसेच हिंदी विभागप्रमुख प्रा.डॉ.एल.एस. मुंडे आणि आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या समन्वयक प्रा. डॉ.राजश्री कल्याणकर यांची विशेष उपस्थिती होती. हिंदी पखवाड्यात आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थिनींचा या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संध्या सातपुते व प्रा. डॉ.राजश्री कल्याणकर यांनी केले.

# पुण्याचा यंदाचा गणेशोत्सव : पाच वेगळी निरीक्षणे : डॉ. भारत कऱ्हाड

पुण्याचा गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नाही, तर शहराच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. गणेश मंडळांची सजावट, ढोल-ताशे, सांस्कृतिक कार्यक्रम, मिरवणुका आणि नागरिकांचा सहभाग यामुळे पुण्याच्या गणेशोत्सवाला स्वतंत्र ओळख मिळाली आहे. दरवर्षी हा उत्सव काही ना काही नवीन अनुभव देतो. यंदाच्या गणेशोत्सवाकडे प्रत्यक्ष अनुभवाच्या दृष्टीने पाहताना काही वेगळी निरीक्षणे जाणवली. त्यातून उत्सवाचे बदलते स्वरूप समजून घेण्याची संधी मिळते.

१. कार्यकर्त्यांचा उत्साह आणि मिरवणुकीचा जल्लोष

विसर्जन मिरवणुकीत गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह दिसत होता. ढोल-ताशे, वाद्ये आणि डीजेच्या तालावर तरुणाई मोठ्या उत्साहाने सहभागी झाली होती. आपल्या गणपतीला निरोप देताना कार्यकर्त्यांनी उत्सवाचा आनंद मनापासून घेतला.

काही ठिकाणी डीजेचा आवाज मोठा होता. त्याच वेळी मिरवणूक पाहण्यासाठी रस्त्यावर आलेल्या नागरिकांची गर्दी काही भागांत अपेक्षेपेक्षा कमी जाणवली. याचा अर्थ नागरिकांचा गणेशोत्सवावरील उत्साह कमी झाला, असा निष्कर्ष मात्र काढता येणार नाही. मिरवणुकीचे मार्ग, वेळ, वाहतूक, हवामान आणि वैयक्तिक सोयी यांचा गर्दीवर परिणाम होत असतो.

काही कुटुंबांनी घरातूनच उत्सवाचा आनंद घेतला. काहीजण बाहेरगावी, विशेषतः कोकणात गेले होते. काहींनी कमी गर्दीच्या ठिकाणी जाऊन दर्शन घेतले, तर काहींनी कडेने उभे राहून गणपतीचे दर्शन घेऊन परतणे पसंत केले. लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक असलेल्या काही कुटुंबांनीही घरात राहणे पसंत केले.

यातून एवढेच जाणवते की नागरिक उत्सवाचा आनंद घेत आहेत; मात्र तो अनुभव घेण्याच्या त्यांच्या पद्धती बदलत आहेत.

२. विद्यानंद बापट यांच्या आवाहनाची चर्चा

गणेशोत्सवातील शिस्त आणि ध्वनीप्रदूषणाबाबत विद्यानंद बापट यांनी केलेल्या आवाहनाची यंदा चर्चा झाली. प्रत्येकाने त्याचा स्वीकार केला असे नाही; मात्र काही लोकांनी त्यावर विचार केला, हेही महत्त्वाचे आहे.

सामाजिक बदल एका दिवसात होत नाही. एखादा विचार मांडला जातो, त्यावर चर्चा होते आणि हळूहळू त्याचा परिणाम दिसू लागतो. यंदा काहींनी विचार केला असेल; पुढील वर्षी आणखी काही जण त्याचा विचार करतील आणि त्यातील काही बाबी आचरणातही आणतील, अशी अपेक्षा ठेवता येते.

उत्सवाचा आनंद कायम ठेवत शिस्त आणि संयम वाढवण्याची प्रक्रिया अशाच प्रकारे पुढे जाऊ शकते.

३. राजकीय उपस्थितीचे वेगळे चित्र

यंदाच्या गणेशोत्सवात राजकीय उपस्थितीही काहीशी वेगळी जाणवली. मागील काही वर्षांत गणेश मंडळांना भेटी देणारे राजकीय नेते, कार्यकर्त्यांचे स्वागत आणि मोठे शुभेच्छा फलक यामुळे राजकीय उपस्थिती ठळकपणे दिसत असे. यंदा काही प्रमुख गणपतींना नेत्यांनी भेटी दिल्या; काही मोठे नेते एकमेकांच्या घरी जाऊन गणेशदर्शन घेताना दिसले. मात्र लहान-सहान गणेश मंडळांना मोठ्या प्रमाणावर भेटी देण्याचे चित्र तुलनेने कमी दिसले.

राजकीय ब्रँडिंगही यंदा फारसे ठळक जाणवले नाही. नगरसेवक, आमदार आणि खासदार यांच्या नावाचे मोठे स्वागतफलक किंवा शुभेच्छा फलक काही भागांत कमी होते. काही कार्यकर्त्यांनी आपल्या पातळीवर फलक लावले होते. पुनीत बालन यांच्या नावाचे फलक मात्र तुलनेने अधिक ठळकपणे दिसले.

काही ठिकाणी अजित पवार यांचे बॅनर, छायाचित्रे आणि रांगोळ्यांमधून त्यांची आठवण जपलेली दिसली. त्यांच्या निधनानंतरही त्यांच्या आठवणी कार्यकर्त्यांच्या आणि समर्थकांच्या मनात असल्यामुळे कदाचित या माध्यमातून त्यांना आदरांजली वाहण्यात आली असावी.

निवडणुकीचे तातडीचे वातावरण नसल्यामुळे यंदाचे राजकीय चित्र काहीसे संयमित राहिले असावे. मात्र याकडे केवळ राजकीय कारणांच्या चौकटीत न पाहता, गणेशोत्सवातील बदलत्या सामाजिक वातावरणाचा एक भाग म्हणून पाहता येईल.

४. सामाजिक आशयाचे काही देखावे

गणेशोत्सव हा मनोरंजनाबरोबरच समाजप्रबोधनाचेही माध्यम राहिला आहे. यंदाही काही मंडळांनी सामाजिक विषयांवर आधारित देखावे सादर केले. तुकाराम मुंढे यांच्यासारख्या सामाजिक आशयाशी संबंधित विषयांवरील काही देखावे विशेष लक्ष वेधून घेत होते.

मात्र एकूण पाहता सामाजिक प्रश्न, जनजागृती आणि समाजप्रबोधन यांना पूर्वीइतके व्यापक स्थान अनेक ठिकाणी जाणवले नाही. याचा अर्थ सामाजिक विषय हाताळलेच गेले नाहीत, असा नाही. अनेक मंडळांनी आपल्या पद्धतीने सामाजिक संदेश दिले असण्याची शक्यता आहे.

तरीही पुढील वर्षी सजावट आणि मनोरंजनासोबत समाजाला विचार करायला लावणारे विषय अधिक प्रभावीपणे मांडले गेले, तर गणेशोत्सवाची सामाजिक बाजू आणखी समृद्ध होईल.

५. विसर्जन व्यवस्था आणि शिस्त



डॉ. भारत कऱ्हाड

महानगरपालिकेने गणेशमूर्ती विसर्जनासाठी विविध ठिकाणी हौद उपलब्ध करून दिले होते. अनेक नागरिकांनी या व्यवस्थेचा उपयोग केला. काही ठिकाणी मात्र नागरिक कॅनलमध्ये उतरून विसर्जन करताना दिसले, तर काहींनी नदीमध्ये विसर्जन केले.

ही बाब सुरक्षितता आणि पर्यावरणाच्या दृष्टीने विचार करण्यासारखी आहे. उपलब्ध केलेल्या हौदांचा अधिकाधिक वापर झाला, तर विसर्जन अधिक सुरक्षित आणि नियोजित पद्धतीने होऊ शकते. यासाठी प्रशासनाची व्यवस्था आणि नागरिकांचा सहकार्याचा दृष्टिकोन या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या आहेत.

या काही निरीक्षणांबरोबरच एक सकारात्मक बाब विशेषत्वाने नमूद करावी लागेल—यंदाचा गणेशोत्सव आणि विशेषतः विसर्जनाचा सोहळा एकूणच तुलनेने शिस्तीत पार पडला. एवढ्या मोठ्या सार्वजनिक उत्सवाचे नियोजन, वाहतूक व्यवस्था आणि सुरक्षा यांचा आवाका लक्षात घेता ही निश्चितच समाधानाची बाब आहे.

बदलत्या उत्सवाकडे सकारात्मक दृष्टीने

यंदाच्या गणेशोत्सवात कार्यकर्त्यांचा उत्साह कायम राहिला, नागरिकांनी आपल्या सोयीने उत्सवाचा आनंद घेतला, राजकीय उपस्थिती काहीशी संयमित राहिली, काही सामाजिक देखावे लक्ष वेधून घेत होते आणि विसर्जनाची व्यवस्था मोठ्या प्रमाणावर करण्यात आली. या सगळ्या बाबी एकत्र पाहिल्या तर पुण्याचा गणेशोत्सव बदलत्या काळाशी जुळवून घेत असल्याचे दिसते.

काही गोष्टींमध्ये सुधारणा करण्याची संधी आहे, तर काही बाबी निश्चितच समाधान देणाऱ्या आहेत. उत्सवाचा आनंद कमी करण्याचा प्रश्न नाही; उलट तो अधिक आनंददायी, शिस्तबद्ध, सामाजिकदृष्ट्या अर्थपूर्ण आणि सर्वसमावेशक करण्याची संधी आहे.

विद्यानंद बापट यांच्या आवाहनाचा काहींनी यंदा विचार केला असेल. ज्यांनी केला नाही, ते पुढील वर्षी करतील, अशी अपेक्षा ठेवता येईल. विचारातून आचरणाकडे जाणारी प्रक्रिया हळूहळू घडते.

एकूणच यंदाचा गणेशोत्सव उत्साहात आणि तुलनेने शिस्तीत पार पडला. काही बदल आणि काही प्रश्न जाणवले असले तरी त्यातून पुढील वर्षासाठी अधिक चांगले नियोजन करण्याची संधी मिळते. पुण्याच्या गणेशोत्सवाची समृद्ध परंपरा अशीच पुढे जात राहावी आणि त्यात उत्साहाबरोबरच सामाजिक जाणीव, शिस्त आणि आपलेपणा अधिक वाढावा, हीच अपेक्षा.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
● बीड, रविवार 27 सप्टेंबर 2026






पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त परळीत भाजपचे सेवा संकल्प अभियान

## ना. पंकजाताई मुंडेंच्या उपस्थितीत रांगोळी स्पर्धा, अंगणवाडी सेविकेचा सन्मान, महिला रिक्षाचालकांना वाहन परवाने वितरित

**परळी वैजनाथ |प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी 'सेवा' आणि 'संकल्प' यातून आपल्याला कार्याची दिशा दिली आहे. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत शासनाच्या कल्याणकारी योजना पोहोचविणे, त्याबाबत जनजागृती करणे आणि गरजू घटकांना सक्षम व आत्मनिर्भर बनविणे, हीच खरी जनसेवा आहे असं राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर दरम्यान भाजपच्या वतीने राज्यभर सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे, याचाच एक भाग म्हणून शहरात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. या अभियानांतर्गत आयोजित रांगोळी स्पर्धा, अंगणवाडी सेविकांचा सन्मान व महिलांना आत्मनिर्भर बनविण्याच्या उद्देशाने मोटार वाहन चालविण्याचे प्रशिक्षण-लायसन्स वितरण ना पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते वितरित करण्यात आले.







यावेळी वैद्यनाथ बँकेचे अध्यक्ष विनोद सामत, उपाध्यक्ष रमेश कराड, सतीश मुंडे, मंडलाध्यक्ष वसंत निर्मळ,कार्यक्रमाचे संयोजक नगर परिषदेचे बांधकाम सभापती प्रा.पवन मुंडे, नगरसेविका पूजा तोतला, अंजली माळी, योगेश मेनकुदळे, निळकंठ चाटे, श्रीराम मुंडे, विजय वाककेर, शांतीलाल जैन, संदीप लाहोटी आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रा. पवन मुंडे यांनी उपक्रमामागील भूमिका स्पष्ट केली.सेवा, कला व सन्मान यादृष्टीने या उपक्रमांचे आयोजन केले असुन भरभरून प्रतिसाद मिळत आहे.या माध्यमातून एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

■ **आकर्षक रांगोळ्या व उपक्रमांचे पंकजाताईंनी केलं कौतुक**

'विकसित भारत' आणि केंद्र सरकारच्या कल्याणकारी योजना या विषयांवर परळी शहरातील विद्यार्थ्यांसाठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी विविध संकल्पना आणि सामाजिक संदेश आपल्या रांगोळ्यांमधून प्रभावीपणे मांडत आकर्षक व कल्पक रांगोळ्या साकारल्या याचे पंकजाताई मुंडे यांनी भरभरून कौतुक केले. यावेळी समाजातील विविध घटकांसाठी योगदान देणाऱ्या अंगणवाडी सेविकांचा सन्मान करण्यात आला. तसेच महिलांना आत्मनिर्भर बनविण्याच्या उद्देशाने मोटार वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांना यावेळी वाहन चालविण्याचे लायसन्स वितरित करण्यात आले.महिलांच्या स्वावलंबनाला चालना देणाऱ्या या उपक्रमामुळे महिलांना रोजगाराच्या आणि दैनंदिन जीवनातील स्वावलंबनाच्या दृष्टीने नवे कौशल्य मिळाले आहे हे कौतुकास्पद असल्याचेही पंकजाताई मुंडे यांनी सांगितले.कार्यक्रमास भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रभू वैजनाथांच्या भूमीतील सुपुत्र श्री. किरण गित्ते( IAS )यांचा राष्ट्रीय पातळीवर गौरव!

**परळी ( प्रतिनिधी):**

प्रभू वैजनाथांच्या पावन भूमीतील सुपुत्र आणि त्रिपुरा राज्याचे आरोग्य सचिव, आयएएस अधिकारी श्री. किरण गित्ते साहेब यांनी पुन्हा एकदा आपल्या उत्कृष्ट आणि अभ्यासू प्रशासकीय कर्तृत्वाच्या बळावर राष्ट्रीय पातळीवर परळीचा आणि संपूर्ण महाराष्ट्राचा डंका वाजवला आहे. नवी दिल्लीतील ऐतिहासिक विज्ञान भवन येथे आयोजित 'आरोग्य मंथन २०२६' या अत्यंत मानाच्या राष्ट्रीय परिषदेत त्यांनी सादर केलेल्या डिजिटल आरोग्य क्रांतीच्या मॉडेलचे केंद्रीय आरोग्यमंत्री श्री. जे. पी. नड्डा यांच्यासह देशभरातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी विशेष कौतुक केले.

आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या (AB-PMJAY) आठव्या वर्धापन दिनानिमित्त आणि आयुष्मान भारत डिजिटल मिशनच्या (ABDM) पाचव्या वर्धापन दिनानिमित्त राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाने (NHA) या भव्य परिषदेचे आयोजन केले होते.

या उच्चस्तरीय परिषदेत बोलताना त्रिपुराचे आरोग्य सचिव श्री. किरण गित्ते साहेब यांनी त्रिपुरा राज्यातील 'इंटीग्रेटेड हेल्थ मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टीम' (IHMIS) आणि डिजिटल आरोग्य क्रांतीचा आलेख देशभरातील तज्ज्ञांसमोर मांडला. ते म्हणाले की, त्रिपुरा राज्य आता जुन्या कागदी पद्धतीकडून पूर्णपणे आधुनिक, एकमेकांशी जोडलेल्या व नागरिक-केंद्रित डिजिटल प्रणालीकडे वेगाने वाटचाल करत आहे. येत्या ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत राज्यातील सर्व जिल्हा रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रे पूर्णपणे डिजिटल करण्याचा निर्धार त्रिपुरा सरकारने केला आहे.

श्री. किरण गित्ते यांनी पुढे स्पष्ट केले की, आयएचएमआयएस (IHMIS) हे केवळ रुग्णालयीन नोंदणी संगणकीकृत करण्यापुरते मर्यादित नाही, तर नागरिक, डॉक्टर, परिचारिका, रुग्णालये, लॅब, औषधालये आणि विविध आरोग्य योजनांना एकाच डिजिटल व्यासपीठावर आणण्याचे हे माध्यम आहे. या प्रणालीमुळे डिजिटल प्रिस्क्रिप्शन, ऑनलाईन लॅब रिपोर्ट्स आणि डिजिटल 'आभा' (ABHA) आयडीच्या माध्यमातून रुग्णांना जुन्या फायली व कागदपत्रे सोबत बाळगण्याची गरज उरणार नाही. तसेच ऑनलाईन नोंदणीमुळे रुग्णालयांमधील वाट पाहण्याचा वेळ कमी होईल आणि आपत्कालीन उपचारात रुग्णाची जुनी वैद्यकीय माहिती डॉक्टरांना एका क्लिकवर उपलब्ध होईल.

डिजिटल प्रणाली यशस्वी करण्यासाठी केवळ तंत्रज्ञान पुरवून चालणार नाही, तर त्याचा वापर करणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांचे सक्षमीकरण करणे तितकेच गरजेचे आहे, असे सांगत श्री. किरण गित्ते यांनी त्रिपुरातील सर्व ८ जिल्ह्यांमध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण व कौशल्य विकास उपक्रम राबवले जात असल्याचे नमूद केले.

प्रभू वैजनाथांच्या कुशीत जन्म घेतलेले श्री. किरण गित्ते साहेब यांनी आपल्या अफाट कार्यक्षमतेच्या जोरावर त्रिपुरासारख्या राज्यात आरोग्य क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणले आहेत. देशाच्या राजधानीत केंद्रीय आरोग्यमंत्र्यांच्या उपस्थितीत एका राज्याच्या डिजिटल आरोग्य क्रांतीचे नेतृत्व करताना परळीच्या सुपुत्राला पाहून संपूर्ण परळी तालुका व बीड जिल्ह्यातील नागरिकांची मान अभिमानाने उंचावली आहे. या राष्ट्रीय स्तरावरील यशाबद्दल परळी परिसरातून श्री. किरण गित्ते साहेब यांच्यावर सर्वस्तरातून कौतुकाचा आणि अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**नवी दिल्लीतील 'आरोग्य मंथन २०२६' परिषदेत केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांच्या उपस्थितीत त्रिपुराच्या डिजिटल हेल्थ मॉडेलचे सादरीकरण; ३१ ऑक्टोबरपर्यंत संपूर्ण राज्य डिजिटल करण्याचे लक्ष्य!**



## हवामान बदलाच्या विळख्यात मराठवाडा! स्मृती व्याख्यानमालेत होणार चिंतन



**परळी | प्रतिनिधी**

ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी, बीड जिल्ह्याचे माजी खासदार आणि महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे संस्थापक कॉ. गंगाधरअप्पा बुरांडे यांच्या १८ व्या स्मृतिदिनानिमित्त मोहा (ता. परळी वैजनाथ) येथे 'कॉ. गंगाधरअप्पा बुरांडे स्मृती व्याख्यानमालेचे' आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम गुरुवार, दिनांक १ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता महाराष्ट्र विद्यालय, मोहा येथे संपन्न होणार आहे.

'दुष्काळ फक्त पाण्याचाच नाही, धोरणाचाही आहे! प्रश्न केवळ शेतकऱ्यांचाच नाही; तर पुढे येणाऱ्या प्रत्येक पिढीच्या अस्तित्वाचा आहे!' या ज्वलंत विचारावर आधारित, यंदाच्या व्याख्यानाचा विषय 'हवामान बदलाच्या विळख्यात मराठवाडा' असा ठेवण्यात आला आहे. या विषयावर सखोल मार्गदर्शन करण्यासाठी प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ पर्यावरण अभ्यासक अतुल देऊळगावकर उपस्थित राहणार आहेत. बदलते हवामान, वाढते तापमान, अनियमित पाऊस, शेती, दुष्काळ आणि पर्यावरण व सामाजिक जीवनमान यावर होणारे परिणाम या गंभीर व सद्यस्थितीतील महत्त्वाच्या मुद्द्यांवर ते उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत.

यापूर्वीच्या व्याख्यानमालेस पुरोगामी विचारवंत गोविंद पानसरे, रॅमन मॅगसेसे पुरस्कार प्राप्त जगविख्यात जलतज्ञ राजेंद्रसिंह राणा, कृषी अभ्यासक तथा जागतिक पत्रकार पी. साईनाथ, संगणक तज्ञ अच्युत गोडबोले यांसारख्या प्रतिभावंत महानुभाव व्यक्तिमत्त्वांचे मार्गदर्शन लाभले असून, या वर्षीच्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कॉ. गंगाधरअप्पा बुरांडे स्मृती प्रतिष्ठान, अंबाजोगाईचे अध्यक्ष तथा 'सीटू' संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष कॉ. डॉ. डी. एल. कराड हे भूषविणार आहेत.

महाराष्ट्र शिक्षण संस्था, मोहा व कॉ. गंगाधरअप्पा बुरांडे स्मृती प्रतिष्ठान मागील अनेक वर्षांपासून शेतकरी, शेतमजूर आणि त्यांचे पाल्य यांच्या कल्याणाकरिता सतत प्रयत्नशील असून, वर्तमान दुष्काळी परिस्थितीतही त्यांच्यासोबत खंबीरपणे उभे आहेत. याच सामाजिक बांधिलकीतून आणि पर्यावरण संवर्धनाबाबत समाजात व्यापक जनजागृती निर्माण होण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या विशेष व्याख्यानास नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व पर्यावरणप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक कॉ. गंगाधरअप्पा बुरांडे स्मृती प्रतिष्ठान अंबाजोगाई आणि महाराष्ट्र शिक्षण संस्था मोहा, ता. परळी वै. यांच्या वतीने करण्यात आले आहे.

